# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २६ सप्टेंबर २०१७

## मुंबई विद्यापीठात स्थापन होणार भारतीय बोलीभाषांचे शैक्षणिक केंद्र

## नागालँडचे राज्यपाल पी.बी.आचार्य यांच्या हस्ते उदघाटन

मुंबई - भारतीय बोली भाषेमध्ये मोठे सामर्थ्य असून,भारतीय बोलीभाषांचा आदर व्हायला हवा असे प्रतिपादन नागालँड आणि आसामचे मा. राज्यपाल पी.बी.आचार्य यांनी केले.आज मुंबई विद्यापीठात पूर्वोत्तर राज्यातील बोलीभाषा केंद्रांचे उदघाटन मा.राज्यपाल यांच्या हस्ते झाले.पूर्वोत्तर राज्यातील स्वातंत्र्य सेनानी राणी मा गाईदीनलीऊ यांच्या नावाने हे केंद्र लवकरच मुंबई विद्यापीठात सुरु करण्यात येणार आहे. पूर्वोत्तर राज्यातील बोलीभाषा राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.या राज्यातील बोलीभाषांना एक समृध्द संस्कृतीचा वारसा असून ,पूर्वोत्तर राज्यातील सात राज्यात जवळपास ३०० हून अधिक बोलीभाषा बोलल्या जातात.या भाषा शिकण्याचं एक मोठ दालन आता मुंबई विद्यापीठात उपलब्ध होणार आहे.पूर्वोत्तर भागातील ग्रामीण आणि आदिवासी बहुल भागातील भाषा,बोलीभाषा बोलता – वाचता यावे यासाठी मुंबई विद्यापीठामध्ये लवकरच भारतीय बोलीभाषेचं केंद्र सुरु करण्यात येणार असल्याचे मा.राज्यपाल यांनी सांगितले.

याप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख म्हणाले की,भाषेमुळे लोकं जवळ येतात,सांस्कृतिक आणि भाषिक वैविध्यतेने नटलेल्या भारतामध्ये आदीवासी आणि ग्रामीण बोलीभाषांचे महत्व अनन्यसाधारण आहे.या प्रकल्पाच्या अनुषंगाने पूर्वोत्तर भागातील बोलीभाषा शिकण्यासाठी मुंबई विद्यापीठामध्ये शैक्षणिक केंद्र निर्माण करण्यात येणार आहे.या केंद्राच्या माध्यमातून सहा महिन्याचे सर्टीफिकेट आणि एक वर्षाचे पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहे.अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर नागालँड येथील ‘अंगामी’ भागात सहा दिवसांची इंटर्नशिप उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

ईशान्य पूर्व  भागातील  मुंबईमध्ये विविध पदांवर कार्यरत असणा-या विषयतज्ज्ञांकडून या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे.या प्रकल्पाचे महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे पूर्वोत्तर राज्यातील सात राज्यांच्या बोलीभाषा लिहता,वाचता आणि बोलता यावे यासाठी हा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून नावारुपाला येणार आहे. ‘नमस्ते’ NAMASTE ( N-NAGALAND,A- ARUNACHAL PRADESH,M-MANIPUR,MEGHALAY,MIZORAM,A-ASAM,S-SIKKIM,T-TRIPURA and E-EAST) प्रकल्पाअंतर्गत हा महत्वाकांक्षी प्रकल्प मुंबई विद्यापीठात साकारला जाणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला कुलसचिव डॉ.एम.ए.खान आणि ईशान्य पूर्व भागातील मुंबई विद्यापीठात शिक्षण घेत असलेले अनेक विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)